# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## Savitribai Phule Pune University

**(formerly University of Pune)**

## नोंदणीकृत पदवीधरांची अधिसभेवरील निवडणूक

**जाहीर प्रकटन**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(न)[(28(2)(t)] व कलम १३१ मधील तरतुदीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दहा (१०) नोंदणीकृत पदवीधर **(Registered Graduates)** अधिसभेवर **(Senate)** निवडून द्यावयाचे आहेत. या निवडणुकीसाठी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १ मधील नियम क्र. ८ च्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेली नोंदणीकृत पदवीधर मतदारांची तात्पूरती मतदार यादी तसेच तसेच त्रुटी असलेल्या अर्जाची यादी (त्रुटींसह) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. ज्या नोंदणीकृत पदवीधर मतदारांच्या नावांबाबत चुकीची नोंद असल्यास, नाव वगळले गेले असल्यास अथवा मतदार यादीत अन्य काही दुरुस्ती/आक्षेप असल्यास खाली नमूद केलेल्या पध्दतीने **मंगळवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ ते शनिवार, दिनांक २६ ऑगस्ट, २०१७ रोजी, संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या संकेतस्थळामार्फत सादर करण्यात यावेत. तसेच **गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या निवडणुक विभागाकडे संबंधित ऑनलाईन अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रत्यक्ष अथवा पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१) एखादा दस्तऐवज Upload केलेला नसल्यास किंवा चूकीचा दस्तऐवज Upload केलेला असल्यास विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर अर्जाचा क्रमांक नमूद केल्यास तो दस्तऐवज Upload करता येईल. अशाप्रकारे Upload केलेल्या दस्तऐवजाची व अर्जाची प्रत काढून (Printout) विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावी.

२) एखाद्या दस्तऐवजाची छायांकित प्रत मूळ अर्जासोबत सादर केलेली नसल्यास किंवा चूकीचा दस्तऐवज जोडलेला असल्यास विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर अर्जाचा क्रमांक नमूद करावा व अर्ज अद्ययावत (Update) करावा आणि अशाप्रकारे अद्ययावत (Update) केलेल्या अर्जाची प्रत काढून (Printout) आवश्यक त्या दस्तऐवजांसह विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावी.

३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) वैद्यक, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी आदी विद्याशाखांतील पदवीधरांनी, ते नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर नसल्याचे या परिपत्रकास जोडलेल्या विहित नमुन्यातील हमीपत्र, त्यांच्या अर्जाचा क्रमांक नमूद केल्यास Upload करता येईल. अशाप्रकारे हमीपत्र Upload केल्यानंतर अर्जाची प्रत काढून (Printout) मूळ हमीपत्रासह विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावे

२१।८।१७

(डॉ.अरविंद दिगंबर शाळीग्राम)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/९७
दिनांक : २१/०८/२०१७

D:\Election 2017\Nondanikrut Padvidhar(Registered Graduates)\Prakatan\Prakatan.docx

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## हमीपत्र

मी, ------------------------------- लिहून देतो/देते की,

१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३१(१)(क){131(1)(a)} मधील तरतूदीस अनुसरुन मी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा (पूर्वीचे पुणे विद्यापीठ) वैद्यक / आयुर्वेद / होमिओपॅथी / युनानी या विद्याशाखेतील ..................... या अभ्यासक्रमाचा पदवीधर असून मी, नोंदणीकृत पदवीधर मतदार म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नावनोंदणी केली आहे.

२) महाराष्ट्र शासनाने वैद्यक / आयुर्वेद / होमिओपॅथी इ. विद्याशाखांसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ नुसार नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन केलेले असून उक्त विद्याशाखा पारंपारिक विद्यापीठांकडून काढून घेतलेल्या असल्याने मी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३१ (१) (ख) {131(1)(b)} नुसार नोंदणीकृत पदवीधर म्हणून नावनोंदणी केलेली नाही.

वरील माहिती ही माझ्या समजुतीप्रमाणे खरी असून भविष्यात वर नमूद केलेली माहिती चुकीची आढळल्यास माझे नाव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांच्या नोंदणीतून व मतदार यादीमधून वगळण्यात यावे, त्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही.

दिनांक : स्वाक्षरी :............................

ठिकाण : नाव :................................